# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
## ग्राहक तक्रार निवारण मंच
## कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर यांचे समोर

ग्राहक तक्रार क्र. १२८–२०१०/ दिनांक :

| | |
|---|---|
| श्री. लक्ष्मण भिमू टिळे,<br>मु.पो. उटगी, जत, जि. सांगली | अर्जदार |

**विरूध्द**

| | |
|---|---|
| १) कार्यकारी अभियंता (का.) तथा नोडल ऑफीसर,<br>म.रा.वि.वितरण कं.लि.,संवसु मंडळ कार्यालय,<br>मंडल कार्यालय, विश्रामबाग, सांगली<br>२) कार्यकारी अभियंता<br>म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित,<br>विभागीय कार्यालय, कवठे महांकाळ, जि. सांगली<br>३) सहाय्यक अभियंता,<br>म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित,<br>उप विभागीय कार्यालय, संख, जि. सांगली | विरूध्द पक्षकार |

**कोरम** :– १) श्री. बी.जी. पवार, अध्यक्ष,
२) श्री. जी.बी.पानकर, सदस्य–सचिव
३) श्री. जी.सी. लेले, सदस्य

महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोग
(ग्राहक तक्रार निवारण मंच)
विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदीनुसार

## न्याय निर्णय

श्री. बी.जी. पवार, अध्यक्ष, ग्रा.त.नि.मंच, कोल्हापूर खालील प्रमाणे न्याय निर्णय देत आहेत.

श्री. लक्ष्मण भिमू टिळे, मु.पो. उटगी, जत, जि. सांगली यांनी नवीन शेतीपंपासाठी ओ.आर.सी. योजनेतून विद्युत पुरवठा मिळावा यासाठी वि.प.कडे मागणी केली आहे. वि.प.ने त्यांना आजतगायत कोणत्याही योजनेतून वीज मंजुरी दिली नाही. त्यामुळे त्यांनी प्रथम अंतर्गत तक्रार निवारण कक्ष, सांगली यांचेकडे दि. ३१.५.२०१० ला तक्रार दाखल केली अंतर्गत कक्षाने आदेश क्र. ६४३९ दि. १.६.२०१० नुसार विलंब झाला असल्याने नुकसान भरपाई द्यावी असे आदेश दिले.

अंतर्गत कक्षाच्या आदेशा विरुध्द दि. १९.६.२०१० रोजी नमुना अ मध्ये मंचासमोर तक्रार दाखल केली व मंचाकडून ओ.आर.सी. योजना बंद असल्याने वि.प.ने इतर कोणत्याही योजनेतून वीज मंजुरी द्यावा व झालेल्या विलंबाबाबत ग्राहकास भरपाई द्यावी अशी मागणी केली. तक्रार प्रतिनिधी श्री. खापरे यांचेमार्फत दाखल केली आहे.

वितरण कंपनीने आपल्या दि. ८.७.२०१० च्या लेखी अहवालात तक्रारदार यांनी शेतीपंपासाठी वीज पुरवठा मागणी केलेली होती व त्या अनुषंगाने त्यांना एस.पी.ए.पी.आय./९५०२२७/२७२/१०–११ क्रमांकानुसार वीज मागणी अर्जास मंजुरी देण्यात आलेली आहे. तसेच त्यांना दि. २२.६.२०१० रोजी चलन देण्यात आलेले आहे. त्यामुळे अर्जदाराने त्यांना कोणत्याच योजनेतून वीज मंजुरी केलेली नाही हे विधान असत्य आहे. त्यामुळे अर्जदाराने मागितलेली विलंब नुकसान भरपाई बाबत आदेश देवू नये.

प्रस्तुतची तक्रार मंचासमोर दि. २७.७.२०१० ला सुनावणीस घेतली असतां, तक्रारदार प्रतिनिधी श्री. खापरे उपस्थित. वि.प.तर्फे प्रभारी सहाय्यक अभियंता संख उप विभाग, श्री. मैंलापूर व श्री. कुलकर्णी, कनिष्ठ अभियंता, कवठे महांकाळ विभाग उपस्थित. श्री. खापरे यांनी मंचासमोर असे प्रतिपादन केले की, तक्रारदाराने दि. २३.३.२००७ ला अर्ज केला आहे. त्यांना चलन देण्यात आले नाही. मूळ अर्ज ओ.आर.सी. योजनेनुसार असलेने ओ.आर.सी. प्रमाणे मागणी केली होती, परंतु मा. विद्युत नियामक आयोगाने ओ.आर.सी. योजनेला बंदी घातली आहे. तक्रारदार यांस दि. २२.६.२०१० ला चलन देण्यात आले व त्यांचेकडून नवीन अर्ज घेतला. नवीन अर्ज व कागदपत्रें दि. २८.७.२०१० ला हजर करणार. तक्रारदाराने भरलेल्या रु. ५०/– प्रोसेसिंग फीची पावती देणार आहे असे मंचासमोर सांगितले.

दि. ३१.७.२०१० ला श्री. मैंलापुरे यांना विचारणा केली असतां, अर्जाचा फॅक्स करतो. श्री. खापरे कागदपत्रे देणार नाहीत, वि.प. देणार असे सांगितले. खालील मुद्दा निर्णयासाठी उपस्थित होत आहे.

१) तक्रारदार यांस दि. २३.३.२००७ पासून भरपाई मागणेचा हक्क आहे काय ?

उत्तर : नाही

आदेश ?

खालील प्रमाणे

<u>कारणमिमांसा</u>

तक्रारदार यांनी परिशिष्ट अ मध्ये नवीन शेतीपंपासाठी त्यांनी कधी अर्ज केला याचा उल्लेख केलेला नाही. ते न उघड करण्याचे कारण तक्रारदार यांनाच माहीत. तसेच प्रोसेसिंग फी रु. ५०/– भरली आहे किंवा कसे हे तक्रारीत नमूद केले नाही. मंचासमोर प्रतिनिधी श्री. खापरे यांनी प्रोसेसिंग फी रु. ५०/– भरली आहे असे तोंडी कथन केले, परंतु आजतागायत कुठलीही पूर्तता केलेली नाही. ओ.आर.सी. योजना मा. विद्युत नियामक आयोगाच्या आदेशानुसार बंद असल्याने तक्रारदाराचा दि. २३.३.२००७ चा प्रलंबित असल्याने कृती मानकाचा भंग होत नाही किंवा त्याची पूर्तता करण्यात वि.प.ला अपयश आले आहे असे म्हणता येणार नाही. दि. २२.६.२०१० ला चलन देण्यात आले या बाबत दुमत नाही. अर्थात तक्रारदाराकडून नवीन अर्ज घेवून चलन देण्यात आले व त्याची निश्चित तारीख वि.प.ने रेकॉर्डवर आणलेली नाही, ती आणण्याची हमी घेतली. अर्जाच्या तारखेपासून १ महिन्याचे मुदतीनंतर चलन दिल्याची तारीख २२.६.२०१० पर्यंत झालेल्या विलंबासाठी भरपाई देण्याची वि.प.ची जबाबदारी आहे. अर्ज ११.६.२०१० चा आहे तो दि. १७.८.२०१० चे सुनावणीचे वेळेस श्री. मैंलापुरे यांनी दाखल केला.

तक्रारदाराची दुसरी मागणी कोणत्याही योजनेतून वीज मंजुरी द्यावी अशी आहे. तक्रारदार यांनी चलन भरले किंवा नाही याचा खुलासा केलेला नाही. मंचासमोर वि.प.च्या अधिकाऱ्यानी सांगितले की, ४ पोलचे व ५.२४ कि.मी. वाहिनीचे काम आहे. तक्रारदाराने चलन भरले नंतर व चाचणी अहवाल (टेस्ट रिपोर्ट) दिल्यानंतर संयुक्त पहाणी करुन तक्रारदाराने कागदपत्रांची पूर्तता केल्यानंतर एसपीए पीआय योजनेतून त्यांना विद्युत पुरवठा करण्यात येईल. खालील प्रमाणे आदेश –

## आदेश

१) तक्रारदाराची तक्रार अंशत: मंजूर करण्यात येत आहे.

२) वितरण कंपनीने तक्रारदार यांनी चाचणी अहवाल दिल्यानंतर, संयुक्त पहाणी करुन व तक्रारदारांनी कागदपत्रांची पूर्तता केल्यानंतर नियमाप्रमाणे वीज जोडणी द्यावी.

३) तक्रारदार यांची भरपाईची मागणी फेटाळण्यात येत आहे.

४) सदर आदेशाची अंमलबजावणी केल्याचे महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल ) विनियम २००६ ८.७ नुसार वि.प. यांनी मंचास कळवावे.

५) या निर्णयाविरूध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असलेस त्यांना आदेशाच्या तारखेपासून ६० दिवसांचे आंत मा. विद्युत लोकपाल, केशवा, बांद्रा–कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा(पूर्व),मुंबई–५१ यांजकडे करता येईल.

दिनांक :

( बी. जी. पवार )
अध्यक्ष

श्री. जी.बी.पानकर, सदस्य सचिव :

श्री. जी. सी. लेले, ग्राहक सदस्य :

एकमताच्या / बहुमताच्या आदेशाची अंमलबजावणी करण्यात यावी.

( बी. जी. पवार )
अध्यक्ष